वर्ष पहिले । अंक दुसरा । ऑगस्ट 2023

# दर्पण



चेतना
अपंगमती
विकास
संस्थेचे
वार्तापत्र

www.chetanavikas.in

चेतना

सस्नेह नमस्कार,

दर्पणचा हा दुसरा अंक आपल्यासमोर सादर करताना मनापासून आनंद होतो आहे. यावर्षी १ मे रोजी दर्पणचा शुभारंभ करण्यात आला आणि त्या पहिल्या अंकाचे आपण सर्वांनी छान स्वागत केले. अनेकांनी अंक आवडल्याचे आवर्जून कळविले. त्यामुळे आमचा उत्साह द्विगुणित झाला आहे. आपल्यातील संवाद वाढवण्याचे साधन म्हणून या वार्तापत्राकडे आम्ही पाहतो आहोत आणि म्हणूनच आपण आपले काही विचार, महत्त्वाच्या घटना, माहिती आमच्याकडे पाठविल्यास त्याचा जरूर या वार्तापत्रात समावेश करता येईल.




## महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिन

१ मे रोजी महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने चेतनाच्या दर्पण या वार्तापत्राचा कोल्हापूर दैनिक सकाळचे कार्यकारी संपादक निखिल पंडितराव यांचे हस्ते शुभारंभ करण्यात आला. या वार्तापत्राच्या माध्यमातून संस्था, पालक, हितचिंतक, देणगीदार यांच्यात एक मुक्तसंवाद घडून यावा व संस्थेचे कार्य, विविध उपक्रम सर्वांपर्यंत पोहोचावेत या विचाराने हे वार्तापत्र सुरू करण्यात आले आहे. याच दिवशी येणाऱ्या जागतिक कामगार दिनाचे औचित्य साधून संस्थेच्या कार्यशाळेत काम करणारे दोन विद्यार्थी निनाद गुरव व सुयश निलजे यांची अनुक्रमे जिम मदतनीस व सफाईगार मदतनीस म्हणून संस्थेत नेमणूक करण्यात आली व तशी नेमणूक पत्रे त्यांना प्रदान करण्यात आली. आजच्या दिवशी शाळेची व कार्यशाळेची अखेरची पालक सभा संपन्न झाली. यावेळी पालकांना मुलांचे प्रगती अहवाल देण्यात आले.









## मनशक्ती केंद्रास भेट

लोणावळा येथील मनशक्ती केंद्र यांच्या निमंत्रणावरून संस्थेतील काही शिक्षक, पालक त्यांच्या मुलांसह या केंद्रास दिनांक ३ मे रोजी भेट देण्याकरिता गेले. तेथील विविध उपक्रमांमध्ये - विशेषतः बौद्धिक खेळांमध्ये मुलांनी व पालकांनी उस्फूर्त सहभाग घेतला. येथील वातावरणामुळे व एकूणच विविध उपक्रमामुळे एक वेगळी ऊर्जा या सर्वांनी अनुभवली.





# सत्र शुभारंभ

या महिन्यात दिनांक १५ जू पासून  शाळा व कार्यशाळा सुरू झाली. पहिल्या दिवशी सर्व मुलांचे सर्व शिक्षकांनी गुलाब पुष्प देऊन मनापासून स्वागत केले. त्यांच्यासाठी रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या व फुगे आणि विविध फुलांनी शाळेची सजावट करण्यात आली होती.





## जागतिक योग दिन

दिनांक २१ जून रोजी शाळेत जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. योग शिक्षिका मा. स्नेहा पेडणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व मुले, शिक्षक व काही निमंत्रित पालक या सर्वांनी योगाचे व प्राणायामाचे धडे घेतले.










## राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती

दिनांक २६ जून रोजी  संस्थेत राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. आयुर्वेदाचार्य डॉक्टर सुनील पाटील यांनी शाहू महाराजांच्या आठवणी सांगून त्यांच्या उदार जाणतेपणाचे महत्व विषद केले.

## हेलन केलर जयंती

दिनांक २७ जून रोजी शाळेत हेलन केलर जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या दिवशी आपण स्वतः अपंग असूनही इतर अपंगांसाठी कार्यरत असणाऱ्या व्यक्तीचा हेलन केलर पुरस्कार देऊन सन्मान करत असतो. यावर्षी आस्था सोशल चॅरिटेबल ट्रस्ट, शाहुवाडी चे अध्यक्ष प्रा. बाजीराव वारंग यांचा इंडोको रेमेडीज लि. च्या कार्यकारी संचालक मा. आदिती कारे-  पाणंदीकर यांच्या शुभहस्ते शाल, श्रीफळ, मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. प्राध्यापक बाजीराव वारंग यांना लहानपणीच पोलिओमुळे अपंगत्व आले. मात्र खचून न जाता त्यांनी मोठया जिद्दीने आपले शिक्षण पुरे केले व प्राध्यापक म्हणून नोकरी करत असताना आस्था चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून अनेक अपंगांना आधार देण्याचे कार्य सुरू केले आहे.
याप्रसंगी मा. आदिती कारे-पाणंदीकर यांना श्री. सचिन एकशिंगे यांनी मुलांच्या मदतीने तयार केलेले पोर्ट्रेट देऊन सन्मानित करण्यात आले.









## सचिन एकशिंगे सरांची शाळेला अनोखी भेट...

हेलन केलर जयंतीच्या निमित्ताने चेतनात प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहिलेल्या इण्डोको इंड. च्या मा. अदिती कारे - पाणंदीकर यांना प्रेमाची भेट म्हणून आम्ही सचिन एकशिंगे सरांनी मुलांच्या मदतीने तयार केलेले अदिती मॅडमचे एक पोर्ट्रेट त्यांना दिले होते. ही आमची भेट त्यांना मनापासून आवडली असल्याचे त्यांनी सांगितले व मुंबईला परतल्यावर सचिन सरांना कौतुकाची भेट म्हणून रुपये पन्नास हजारचा चेक त्यांनी पाठवून दिला. पालक सभेत आम्ही तो चेक सरांना देऊ केला. त्यावर सचिन सरांनी संस्थेस रू २५ हजारचा चेक देऊ केला व या पोर्ट्रेट निर्मिती प्रक्रियेत सहभागी १२ मुलांना प्रत्येकी ५०० रू. बक्षिस म्हणून दिले.



## गुरुपौर्णिमा







मंगळवार दिनांक ४ जुलै रोजी शाळेत गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. या दिवशी आपण वेगवेगळ्या क्षेत्रात विद्यादानाचे कार्य करणाऱ्या गुरुतुल्य व्यक्तींना सन्मानित करत असतो. यावर्षी सातारा येथील आर्यलोकचे संचालक आयुर्वेदाचार्य डॉ. आनंद ओक यांना अध्यक्ष श्री. नरेश बगरे यांचे हस्ते शाल, श्रीफळ व गुरुदेव टागोर यांची मूर्ती देऊन सन्मानित करण्यात आले.

## सूतकताई प्रशिक्षण कार्यशाळा




दिनांक १६, १७ व १८ जुलै रोजी शाळेत सूतकताई प्रशिक्षणाची कार्यशाळा घेण्यात आली. पुण्याचे गांधीवादी प्रशिक्षक मा. माधवदादा सहस्त्रबुद्धे यांच्या मार्गदर्शनाखाली काही शिक्षक, पालक व मुलांनी पेटी चरखा व अंबर चरखा वापरून सूतकताईचे प्रशिक्षण घेतले. सूतकताईच्या माध्यमातून होणारे स्वावलंबन, एकाग्रता, मानसिक शांती, स्थिरता असे अनेक फायदे जाणून घेणे हा या प्रशिक्षणा मागचा मुख्य हेतू. या माध्यमातून भविष्यात नियमितपणे सुताची निर्मिती होऊ शकली व त्यातून काही कापड निर्माण होऊ शकले तर त्या निर्मितीचा एक वेगळा आनंद मुलानाही मिळू शकेल ही प्रेरणा या कार्यशाळेमागे होती. ग्रामसेवा मंडळ, गोपूरी, वर्धा व विकास बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, नांदेड यांच्या बहुमोल सहकार्याने ही कार्यशाळा संपन्न झाली.








## शालेय निवडणूक

चेतनामध्ये दरवर्षी मुलांची निवडणूक घेतली जाते. मुलांना एकूणच निवडणूक प्रक्रिया समजावी, निवडणुकीला उभे राहणे, प्रचार करणे, मतदान करणे व निवडून आल्यानंतर यशस्वी उमेदवारांनी वर्षभर काम करण्याची जबाबदारी घेणे अशा अनेक गोष्टी या निवडणुकीतून साध्य होत असतात. यावर्षी दिनांक १४ जुलै रोजी आम्ही मुलांची पुढील गटात निवडणूक घेतली. विद्यार्थी प्रतिनिधी, विद्यार्थिनी प्रतिनिधी, शालेय कार्यक्रम प्रतिनिधी, सांस्कृतिक कार्यक्रम प्रतिनिधी व क्रीडा प्रतिनिधी, उमेदवार विद्यार्थ्यांना चिन्हे देण्यात आली होती. त्यांनी वर्गा-वर्गात जाऊन प्रचार केला. निवडणुकीदिवशी ओळीने सर्वांनी मतदान केले. त्यासाठी खास मतपत्रिका तयार करण्यात आल्या होत्या व मतदान कक्ष उभारण्यात आले होते. १६ जुलै रोजी मतमोजणी झाली व यशस्वी उमेदवारांना बॅच व एक बक्षीस देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले. अतिशय उत्साही वातावरणात या निवडणुका दरवर्षी पार पडतात.

जून २०२३

## शालेय निवडणुका
## काही क्षणचित्रे...









ऑगस्ट २०२३

## १५ ऑगस्ट - स्वातंत्र्य दिन







मंगळवार दिनांक १५ ऑगस्ट रोजी शाळेत ७७ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शरयू हर्बल्स, औरंगाबादच्या संचालिका डॉक्टर रोहिणी काचोळे या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. त्यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या संचलनाला उपस्थितांची उत्स्फूर्त दाद मिळाली. याप्रसंगी गरजू विद्यार्थ्यांना गणवेश व कुष्ठधाम येथील कुष्ठ बांधवांना शिधावाटप करण्यात आले. यासाठी चेतनाला श्री अतुल शिंदे, मा. सविता वेल्हाळ व मा. विनोद तलगेरी यांचे बहुमोल सहकार्य लाभले.

## दिव्यांग कल्याण विभागाचे अध्यक्ष मा. नाम. बच्चू कडू यांची चेतनास भेट





दि.२५ ऑगस्ट - महाराष्ट्र शासनाने सुरू केलेल्या स्वतंत्र दिव्यांग कल्याण विभागाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी नव्याने स्वीकारलेले माननीय नामदार बच्चू कडू यांनी आज चेतनास भेट दिली. सर्व वर्गांची, कार्यशाळेतील विविध विभागांची व संस्थेच्या उपक्रमांची माहिती घेतली. सर्व विभागातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला व नंतर पालक, शिक्षक व संचालक यांचेबरोबर अनौपचारिक बैठक घेतली. सर्व प्रश्न समजून घेतले व सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. महाराष्ट्रातील मी अनेक संस्था पाहिल्या पण चेतनाचे कार्य हे अविश्वसनीय आहे व यापुढे चेतनाने दिव्यांग धोरण ठरवण्यात शासनाच्या बरोबरीने काम करावे असे मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी त्यांना पालक शिक्षक संघाच्या वतीने महालक्ष्मीची मूर्ती, शाळेच्या व कार्यशाळेच्या वतीने श्री. सचिन एकशिंगे यांनी केलेले बच्चू कडू यांचे पोर्ट्रेट व संस्थेतर्फे शाल, श्रीफळ व स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. माननीय बच्चू कडू यांची ही भेट आमच्यासाठी प्रेरणादायी होती.







# चेतनाच्या सहली...

चेतनाच्या विविध उपक्रमांपैकी आमच्या सहली हे आमचे खास वैशिष्ट्य. लांब लांबच्या सहलींबरोबरच आमच्या दैनंदिन सहलींचा विशेषत्वाने उल्लेख करावा लागेल. आमच्या शाळेतील व कार्यशाळेतील एक किंवा दोन वर्ग दररोज सकाळच्या सत्रात सहलीच्या निमित्ताने विविध स्थळांना, ठिकाणांना भेट देतात. छोटी मुले असतील तर ती बागेत, मैदानावर जातील. थोडी मोठी मुले काही प्रेक्षणीय स्थळे, प्रदर्शने, बाजार अशा ठिकाणी जातील. त्याहीपेक्षा मोठी मुले रेल्वे स्टेशन, मॉल, विमानतळ अशा ठिकाणी जातील. तर कार्यशाळेतील मुले वेगवेगळ्या स्वरूपाच्या कारखान्यांना भेट देतात. अलीकडच्या काळात आमच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांसमवेत भेट दिलेली ही काही वैविध्यपूर्ण ठिकाणे.






दिनांक २३ जून - प्रति पंढरपूर नंदवाळ येथे चेतनाची दिंडी




दिनांक ७ जुलै - कात्यायनी परिसरातीतल भातशेती

दिनांक २१ जुलै - एम आय डी सी, गोकुळ शिरगाव येथील तांब्याची भांडी तयार करणाऱ्या माने इंडस्ट्रीजला भेट.




# सहलीची काही क्षणचित्रे...



दिनांक १२ जुलै -
शिवाजी विद्यापीठ व राजाराम तलाव भेट




दिनांक ३ ऑगस्ट
कोल्हापूर विमानतळ भेट

संस्थेस आर्थिक सहकार्य करून या कार्यात सहभागी व्हा.

**ऑनलाइन देणगी जमा करण्यासाठी बँक खात्याचा तपशील**

## Chetana Apangmati Vikas Sanstha

IDBI Bank, Khari corner, Kolhapur. ▪ A/c no. 634104000027566 ▪ IFS code - IBKL 0000634

**संस्थेस देण्यात येणाऱ्या देणगीवर आयकर अधिनियम ८० ग अंतर्गत आयकरात सूट**

*Chetana Apangmati Vikas Sanstha's Newsletter*

**पत्ता- चेतना अपंगमती विकास संस्था, कुष्ठधाम, शेंडा पार्क, कोल्हापूर- ४१६ ०१२**

ईमेल - chetanavikas@gmail.com ▪ संकेतस्थळ - www.chetanavikas.in

हे वार्तापत्र श्री. दिलीप अनंत बापट, सेक्रेटरी, चेतना अपंगमती विकास संस्था
यांनी प्रकाशित केले. फक्त खाजगी वितरणासाठी